# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २०/०२/२०२२ (रविवार) (संध्याकाळ)

---

## जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न करणा—या आरोपीस अटक

**पोलीस स्टेशन काटोल** :— अंतर्गत खुटांबा रोड ३ कि मी दक्षीण. यातील जखमी फिर्यादी व आरोपी हे पती पत्नी असुन त्यांच्यात नेहमी वादविवाद होत असे. या कारणावरून फिर्यादी हीने आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन काटोल येथे रिपोर्ट दिलेल्या तक्रारीचा राग मनात ठेवुन दि. १८.०२.२२ चे २०.०० वा. ते २०.१५ वा दरम्यान आरोपीने फिर्यादीला रात्रीच्या अंधारात सुनसान ठिकाणी थांबवुन ”रिपोर्ट मागे घे’“ तसेच “माझे सोबत आमनेर येथे परत चल” असे म्हटले असता, फिर्यादीने घरी परत जाण्यास नकार दिला असता, आरोपीने त्याच्या कडील एका लहान चाकु सारख्या वस्तुनी फिर्यादीच्या डोळयावर, गालावर, मानेवर व पाठीवर सपासप वार करुन पराठीच्या शेतात ओढत नेले व तीचा गळा दाबुन जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी सौ. करिश्मा सुदर्शन बोरकर वय २५ वर्ष रा. आमनेर ता वरूड ह.मु वाघोडा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे काटोल येथे **आरोपी नामे— सुदर्शन अशोक बोरकर वय २४ रा आमनेर ता वरूड जिल्हा अमरावती याचेविरूध्द पोलीस स्टेशन काटोल येथे कलम ३०७ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आले,** पुढील तपास पोलीस निरीक्षक महादेव आचरेकर पोस्टे काटोल मो.क्र. ८३८००७२२११ हे करीत आहेत.

## केबल चोरी

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— अंतर्गत चनकापुर ३ किमी पश्चिम. यातील फिर्यादी हे महावितरणाचे सबस्टेशन चे काम भारत इलेक्ट्रीक कॉन्ट्रक्टर ॲन्ड मॅन्युफॅक्चरींग प्रायवेट लिमीटेड सांगली मार्फत चनकापुर येथे करत असता यातील अज्ञात आरोपीने दिनांक १६.०२.२२ चे १३.३० वा. ते दि. १८.०२.२२ चे १६.३० वा सबस्टेशन चा कामाकरीता लागनारे कंट्रोल केबलचे २ बंडल अंदाजे ३०० ते ३५० मिटर कीमती ६०,०००/—रू चा माल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— संशोधन केवलदार आवळे वय ३४ रा. अंबाझरी टेकडी बौदध विहाराजवळ गांधी नगर नागपुर यांचे रिपोर्टवरून अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भा.द.वी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास पोलीस हवालदार जळते मो.क. ९६७३८३७००७ हे करीत आहेत.

## अपघातात जखमी

**पोलीस स्टेशन सावनेर :–** अंतर्गत कुनाल ढाब्याचे समोर सावनेर ३ किमी पूर्व. दि. ०३/०२/२२ चे २१/०० वा. दरम्यान, यातील आरोपी याने आपले ताब्यातील मोपेड प्लेझर वाहन क्र. एम.एच ४०, एम. ८३०९ हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन पायदळ जाणा–या १) सौ. बिंदु हरीचंद बेटे वय ४० वर्ष २) हरीचंद जंगलशाह बेटे वय ५० वर्ष दोन्ही रा. आंगेवाडा यांना मागुन धडक मारून जखमी केले व स्वताच गाडी घेवून खाली पडून जखमी होण्यास कारणीभुत झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी सरतर्फे स.फौ अनिल तिवारी पोलीस स्टेशन सावनेर यांचे रिपोर्टवरून **आरोपी नामे– सुरेन्द्र राजाराम दुबे रा. गुजरखेडी सावनेर यांचे विरूध्द कलम २७९,३३७, ३३८ भादवी १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करून तपासात घेतला.** सदर गुन्हयाचा तपास पो. हवा. प्रकाश नांदुरकर पो स्टे सावनेर करीत आहे.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**